ISSN : 2278-8204

International Monthly Research Journal For All Subjects

# AKSHARDEEP

Volume - II ▪ Issue - VII ▪ January 2014



Editor
Ganpu Lahane

Research Paper In History

International Monthly Research Journal, Akshardeep



ISSN 2278-8204
Vol II Issue : VII,
January, 2014

# प्राचीन भारतीय समाजातील गुन्हेगारी

प्रा. डॉ. वसंत व्यंकटराव कदम
इतिहास विभाग प्रमुख
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर

मानवाच्या उत्क्रांतीचा इतिहास लाखो वर्षाचा आहे. या पृथ्वीतलावर मानव साडेसतरा लाख वर्षापूर्वी जन्माला आला असला तरी, नवाश्मयुगात मानवाची शिकारी अवस्था संपुष्टात येऊन तो शेतकरी अवस्थेत स्थिर झाला व झोपडी करून राहू लागला. आत्मसंरक्षण, शिकार, ग्रामाचे संरक्षण इ. परस्पर अवलंबुन असलेली कामे परस्परांच्या सहाय्याने मानवाला शक्य झाले. त्यामुळे त्यांना परस्परांबद्दल आपुलकीची भावना निर्माण झाली. पुढे समाजात कोणी कोणते काम करावे हा प्रश्न निर्माण झाला आणि गुण व कर्मावरून समाजात वर्णव्यवस्था निर्माण झाली असे एक मत आहे. कालांतराने परिस्थितीनुरूप सामुदायिक सहजीवनास सुव्यवस्थित आणि संयमित रुप देण्यासाठी काही नियमांची आवश्यकता निर्माण झाली, त्यातूनच काही नियम निर्माण केले गेले. कालांतराने हेच नियम समाजाच्या व संस्कृतिच्या विकासाबरोबर मान्यता पावले. समाजातील जो कोणी या नियमांचे उल्लंघन करेल तो गुन्हेगार ठरत असे. सामाजिक दृष्टिने एखादा मनुष्य समाज, धर्म, राज्य किंवा व्यक्तिसाठी हानिप्रद कार्य करीत असेल त्याची गणना गुन्ह्यामध्ये केली जात असे.

अपराध, गुन्हा, पाप हे समानार्थी शब्द आहेत. गुन्हा या शब्दाची व्याख्या एक समान करता येत नाही कारण आपण एखाद्या घटनेस आज गुन्हा समजतो तो करणाऱ्यास गुन्हेगार समजतो तो सर्व ठिकाणी सर्व काळासाठी गुन्हा असेलच असे स्पष्ट सांगता येत नाही. मानवी सृष्टीच्या प्रारंभात असा एक काळ होता की, त्या काळी गुन्हे घडतच नव्हते. उदा. ज्या कालखंडात पाप-पुण्य संकल्पनाच अस्तित्वात नव्हती किंवा धर्म-अधर्म याविषयी ज्ञान नव्हते. प्राचीन भारतीय समाजात जे कार्य गुन्हा समजले जात नव्हते तेच कार्य आजच्या आधुनिक काळात गुन्हा समजला जातो. उदा. बहुपत्नीविवाह हा प्राचीन भारतीय समाजात गुन्हा समजला जात नव्हता परंतु आधुनिक भारतात हिंदुसाठी भारतीय दंड संहिता ४९४ नुसार पती व पत्नीच्या जीवन काळात पुन्हा विवाह करणे गुन्हा असल्याचे घोषीत करण्यात आले आहे. तत्कालीन समाजात बालविवाहास समाज मान्यता होती तो विवाह गुन्हा समजला जात नसे. आधुनिक काळात बाल विवाह करणे गुन्हा ठरतो तत्कालीन समाजात विधवा स्त्रीशी विवाह करणे निषिध्द मानले जात होते तर आज विधवा स्त्रीशी विवाह करणे गुन्हा किंवा अपराध ठरत नाही. म्हणुन गुन्हा या शब्दाची व्याख्या करणे कठीण असले तरी पण धर्मविरोधी समाज किंवा राज्यविरोधी कोणतेही कृत्य म्हणजे गुन्हा होय. तसेच कायद्यांच्या किंवा नियमांच्या उल्लंघनाच्या घटनेस गुन्हा समजले जाते. परंतू अशा घटना उघडकीय आल्या पाहिजे आणि नंतर त्या पंच, गाव पंचायत किंवा तत्कालीन न्याय व्यवस्थेत सर्व पुराव्यानिशी सिध्द झाल्या पाहिजेत तरच अशा घटनेस गुन्हा आणि तो करणाऱ्यास गुन्हेगार म्हणून संबोधले जात असे.

प्राचीन भारतीय समाजव्यवस्था ही धर्मशास्त्रावर अवलंबुन होती या समाजात आणि राज्यात धर्म, अधर्म या दोनच संकल्पना समाजमान्य होत्या म्हणून धर्माच्या विरोधात केलेले कोणतेही कार्य अथवा वर्तन हे गुन्हा समजला जात असे. तत्कालीन समाजातील कोणते कार्य अथवा कर्म गुन्हा ठरत होते ते खालील प्रमाणे पाहता येईल.

प्राचीन भारतीय समाजव्यवस्थेत पुढील गुन्ह्यांचा समावेश महापातकात केला जात असे.

International Monthly
Research Journal,
Akshardeep

ISSN 2278-8204
Vol.II. Issue : VII,
January, 2014

१) ब्रह्महत्या

२) सुरापान

३) चोरी

४) गुर्वड : गनागम

५) महापात की संसर्ग

स्मृती काराणी वरील गुन्ह्याची गणना महापातकात केलेली आहे हे गुन्हे करणाऱ्यास देह दंडाची शिक्षा द्यावी असे म्हटले आहे. या महापातकाशिवाय तत्कालीन समाजव्यवस्थेत इतरही गुन्हे होते.

**पुढील प्रमाणे पाहता येतात.**

१) खोट्या राजाज्ञा लिहीणे.

२) अमात्यांमध्ये किंवा अधिकाऱ्यात भेद पाडणे.

३) स्त्री, बालक व ब्राह्मणास त्रास होईल तसे त्यांच्या सोबत वाईट वर्तन करणे किंवा त्यांना मारणे.

४) अयोग्य निकाल देणे.

५) लाच देणे - घेणे, खाणे.

६) असत्य संभाषण करणे, खोटे बोलणे.

७) प्रतिवादीने द्रव्य नाकारणे किंवा वादिने अधिक द्रव्याकरीता खोटे बोलणे.

८) राजासंबंधी धनागार, आयुधगृह, देवांच्या प्रतिमेचे गृह फोडून हत्ती, अश्व इत्यादीकास हरण करणे.

९) व्दारे तोडणे, तट फोडणे, खंदक बुजविणे.

१०) स्नानदानादी जलाशयाचा बांध फोडणे, पाण्यात बुडवून किंवा दुसऱ्या उपायाने ठार मारणे.

११) मनाई केलेले धान्य व इतर पदार्थ परदेशात नेणे.

१२) चोरास मदत करणे, चोराचे चौर्य जाणून त्यास भोजन व चोरीच्या उपयोगी भांडी देणे.

१३) राष्ट्रामध्ये लोकांचे रक्षणाकरीता ठेवलेल्या लोकांनी चोरास मदत करणे.

१४) शेतीची अवजारे नांगर, कुदळी व औताचे साहित्य चोरी करणे. रात्री भिंत फोडून चोरी करणे.

१५) परस्त्री संभोग, शुद्राने ब्राह्मणादी स्त्रीशी संभोग करणे.

१६) एका कन्याने दुसऱ्या कन्याशी दुषित करणे.

१७) कुंपण घातलेल्या शेतातील पिक पशुने खाल्यास शेतकऱ्याच्या दोषामुळे राजभागाची हानी झाल्यास.

१८) दोषवती कन्या दोष न सांगता वरास देणे.

१९) सीमेचा खोटा निर्णय करणे, सीमेच्या वादांत खोटे सांगणे असत्य बोलणे.

२०) शरिरातील शल्यदिकांची वैद्याने बरोबर चिकित्सा न करणे, गाय, घोडे इत्यादीकांची दुचिकित्सा करणे.

२१) पूल, राजाच्या दारांतील ध्वजचिन्ह, पुष्करणी इत्यादिकांस तोडणे.

२२) ग्रामाची अगर नगराची सीमा नाहिशी करणे.

२३) नष्ट झालेले धन राज्याचे अधिकाऱ्यास सापडल्यावर व त्याचे उत्तम प्रकारे संरक्षण होत असता ते चोरणे अगर चोरण्याचा प्रयत्न करणे.

२४) राजा रागावला आहे तुझे धन लुटून नेईल सबब मजजवळ दे असे सांगून धन, कन्या इ.परधनाचा कपटाने अपहार करणे.

२५) राजाच्या धनगृहातून धन नेणारे त्याची आज्ञा न मानणारे राजाशी अधिक वैर वाढविणारे.

International Monthly
Research Journal,
Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.II, Issue : VII,
January, 2014

२६) सुवर्णाची चोरी करणे.

२७) ठेवीचा अपहार करणे.

२८) दुसऱ्याची मालमत्ता किंवा धन आपले आहे असे सांगून विक्री करणे.

२९) गावात किंवा राज्यात राहणाऱ्या लोकांच्या संघात सत्यादीशपथ वाहून एखादा नियम ठरला असता तो नियम न पाळणे.

३०) शास्त्रीय होमादी व्यभिचार कर्म केली असता व मुठ मारणे इत्यादी लैकिक कर्म केली असता मनुष्यवधास सांगितलेली शिक्षा करावी.

३१) एखाद्या मिळकतीचा किंवा संपत्तीचा मालाचा मालक कोण आहे हे माहित नाही त्या मिळकतीवर किंवा संपत्तीवर आपली मालकी सांगणे.

३२) धृतादी करणारे, नाच व गाण्यावर निर्वाह करणारे, वेदांचा व्देष करणारे, श्रृतिस्मृतिबाह्य वर्तन करणारे.

३३) शुद्राने करचरणादी अंगाने व्दिजास प्रहार करणे.

३४) शरीरपीडा, धनग्रहण, इत्यादीकांच्याव्दारा इच्छापूर्वक शुद्राने ब्राह्मणास पीडा करणे.

३५) तस्करादी ग्राम लुटीत असता, जलाचे धरण फुटले असता, मार्गात चोर भेटला असता, जवळ असणाऱ्या लोकांनी या कृत्याचे प्रतिबंधार्थ मदत न करणे.

३६) माता, भार्यादिकांचा त्याग करणे.

३७) ब्राह्मण शेजाऱ्या भोजन न घालणे, क्षत्रियाने शेजाऱ्यास जेवावयास न बोलाविणे.

३८) परिटाने एकाचे वस्त्र दुसऱ्या दणे, कोष्ट्याने बरोबर वजनाचे वस्त्र न देणे.

३९) गृह, तळे, उपवन इ. भय दाखवून हरण करणे. गृह, तळे, उपवन इ. आपलेच आहे अशा भितीने हरण करणे.

४०) अव्याधी नसताना सेवकाने केवळ अभिमानाने काम करण्याचे नाकारणे.

४१) मुदतीनंतर माल परत देणे.

४२) राजाचा कर कमी करण्याकरीता व टाळण्याकरीता मालाची अकाली विक्री करणे, अगर भलत्या मार्गाने माल नेणे, अगर विकलेल्या मालाची संख्या कमी सांगणे.

४३) शुध्द द्रव्यामध्ये अशुध्द द्रव्य मिसळून, ते दुषित करणे. उत्कृष्ट बिजात वाईट बिज मिसळविणे व ते उत्कृष्ट आहे असे सांगून विकणे.

४४) कारागिराने वेध करीता न येणाऱ्या माणिकाचा वेध करणे, वेध करता येणाऱ्या मोत्याचा अयोग्य ठिकाणी वेध करणे.

४५) योग्य किंमत देणाऱ्यास वाईट प्रतीचा माल देणे.

प्राचीन भारतीय समाजव्यवस्थेत वरील सर्व कृती आणि घटकांचा समावेश गुन्हा आणि गुन्हेगारी मध्ये केला जात असे. परंतू आज गुन्हेगारीचे स्वरुप बदललेले दिसून येते. आधुनिक काळात संगणकिय गुन्हे, भ्रष्टाचार, संघटीत गुन्हे घडतांना दिसून येतात. या गुन्हांसाठी वेगवेगळ्या तंत्रज्ञानाचा वापरही केला जातो. थोडक्यात प्राचीन आणि आधुनिक काळातील गुन्हे आणि गुन्हेगारीचे स्वरुप पाहता आज समाजामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते.

संदर्भ सूची :

१) कुलकर्णी काशिनाथ, गुन्हे व गुन्हेगार, पुणे सुयोग प्रकाशन पुणे १९९८

२) डॉ. शुक्ला साधना, प्राचीन भारत में अपराध और दंड कानपूर, प्रज्ञा प्रकाशन १९८७

३) डॉ. कठारे अनिल, प्राचीन भारताचा इतिहास कल्पना प्रकाशन नांदेड.

४) मनुस्मृती, अध्याय ९ श्लोक २३५, २४९, २७०